# प्रकरण - ३

## प्रकरण तिसरे

# सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे सामाजिक व शेतीविषयक कार्य

**प्रस्तावना**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे शिक्षण, सहकार तसेच राजकीय कार्याबरोबरच सामाजिक व शेतीविषयक कार्यसुद्धा महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे शिक्षण संपल्यानंतर ते समाजामध्ये प्रत्यक्षपणे काम करु लागले. सामाजिक व शेतीविषयक कार्य करण्याचे गुण त्यांच्याकडे उपजतच होते. हे त्यांचे सामाजिक व शेतीविषयक कार्य पाहिल्यानंतर दिसून येते. त्यांनी समाजामध्ये तळागाळातील कार्यकर्त्यांबरोबर काम केले केल्यामुळे त्यांची सामाजिक कार्य करण्याची आवड वाढत गेली. काकासाहेबांनी वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी सन १९३६ मध्ये काँग्रेस सेवादलाच्या माध्यमातून कार्यास प्रारंभ केला.

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे "जीवात जीवमान असेपर्यंत जनसेवाच करु" हे ब्रीदवाक्य होते. ते नेहमी त्यानुसारच आपले समाजकार्य करीत असत. सर्वसामान्य समाजाबरोबर त्यांचं अतुट नातं होते. ग्रामीण भागातील समाज बदलला पाहिजे यासाठी जेवढ्या प्रमाणात प्रयत्न आपल्या हातून होतील तेवढ्या प्रमाणात ते प्रयत्न करत होते. काकांच्या कर्तृत्वामुळे सर्वांचे जीवनमान सुधारले. यामध्ये सर्वांचे भाग्य आहे. काकासाहेबांना तळागाळातील लोकांबद्दल सतत आस्था होती. ते लोकांची भांडणे योग्य न्यायानुसार करीत होते. गोरगरिबांना स्वतः कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी ते उत्स्फूर्तपणे मदत सोडवित होते. गरीब-श्रीमंत, जातीभेद ते कधीही करीत नसत. सर्वांना समान न्याय काकासाहेब देत असत. म्हणून ग्रामीण भागातील सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रातील इतर भागालाही मार्गदर्शक असे कार्य त्यांनी केलेले आहे.

सामाजिक कार्याबरोबरच काकांनी शेतीविषयक कार्य अतिशय चांगल्या प्रकारे केलेले आहे. त्यांचा जन्मच मुळात शेतकरी कुटुंबात झाला असल्यामुळे शेतकऱ्यांविषयी त्यांना अतिशय तळमळ होती. त्यांना शेतीविषयी आईप्रमाणेच प्रेम होते. ते माळशिरसच्या उजाड माळरानावर शेतकऱ्यांचा भाग्यलेख लिहणारे, त्यांच्या सुखस्वप्नांच नंदनवन

फुलविणारे स्वयंभू होते. स्वतःच्या असामान्य कर्तृत्वाने लोकसेवेचे एवढे उत्तुंग, गौरवशाली गौरीशंकर गाठले की त्यापुढे सर्वांनी विनम्रतेने आणि आदराने आपली मान डोलवावी. अकलूजचाच नव्हे तर सोलापूर जिल्हयाचाच त्यांनी संपूर्ण कायापालट केला. विकासाच्या सर्व योजना राबवल्या, काश्मिर पाहिल्याशिवाय भारत पाहिल्यासारखे वाटत नाही. त्याचप्रमाणे अकलूज पाहिल्याशिवाय महाराष्ट्र पाहिल्यासारखे वाटत नाही असे म्हणावेसे वाटते. केवळ ग्रामपंचायत असणाऱ्या या गावी बालवाडीपासून महाविद्यालयापर्यंतच्या सर्व शैक्षणिक सुविधा त्यांनी निर्माण केल्या. त्यांना अपयश अस सामाजिक व शेतीविषयक काम करताना माहीतच नव्हतं. अशक्य हा शब्द त्यांना कधीही अडवू शकला नाही.

काकासाहेबांचे 'शेतात पाणी तर शेतकऱ्यांत पाणी' हे सूत्रवाक्य होतं. शेतकऱ्यांची चौफेर प्रगती झाली पाहिजे म्हणून त्यांनी दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनासारख्या अनेक संस्था स्थापन केल्या. तसेच जपानमधील शेतीची प्रगती पाहण्यासाठी आपल्या पत्नी व मुलांसमवेत ते जपानला प्रदर्शन पाहण्यासाठी गेले होते. ते हाडाचे शेतकरी होते. त्यामुळे ३० जानेवारी १९७९ साली सोलापूर येथे भरलेल्या शेतकरी मेळाव्याला ते हजर राहिले व डॉक्टरांनी भाषण करण्यास आजारपणामुळे विरोध केला असताना त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले ते अखेरचे भाषण ठरले.

## सामाजिक कार्य

### शिवाजी महाराजांचे अनुकरण

जातीपेक्षा देशावर प्रेम करणारी माणसे शिवाजी महाराजांनी हेरुन या जनसामान्यांच्याच पाठींब्याने स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे "हे राज्य माझ्या मालकीचे नाही, हे श्रींचे राज्य आहे व मी फक्त त्याचा विश्वस्त आहे." या भावनेतून जनसामान्यांची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.[१]

शंकरराव मोहिते-पाटील यांनी हे सूत्र अंमलात आणून अनेक संस्थांच्या माध्यमातून जनसामान्यांची दुःखे दूर केली व सामान्य माणसास मान ताठ करुन जगण्याची संधी प्राप्त करुन दिली.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

भारतात ७० टक्क्यांहून अधिक लोक खेड्यात राहत असून त्यांचा विकास हा शेती विकासावर अवलंबून आहे हे त्यांनी जाणले होते. माग तो शेतकरी असो वा एखादा कामगार असो. त्यांच्या उत्कर्षासाठी कै. शंकरराव मोहिते-पाटील हे सातत्याने अहोरात्र प्रयत्नशील होते. ते स्वत: उत्तम शेतकरी होते. शेतीतून अध्कि उत्पन्न काढण्यासाठी ते स्वत:ही प्रयत्नशील असत. पारंपरिक शेती पद्धती सोडून ते आपल्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत. त्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा शास्त्रीय होता. 'आधी केले आणि मग सांगितले' या उक्तीप्रमाणे नवनवीन तंत्रज्ञान आपल्या शेतात राबवत असत. त्यांच्या या कृतीचा आणि मनमिळावू स्वभावाचा ठसा सामान्य जनतेच्या मनावर कायमचा उमटला गेला. साहजिकच त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांच्याभोवती सामान्य जनताही आकृष्ट होवून त्यांच्याकडे जनतेचा ओढा वाढू लागला. त्यांच्या कार्याला चालना मिळू लागली. आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी ते दिवसरात्र झटू लागले. साहजिकच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विकासाची धुरा नकळतच त्यांच्याकडे चालून आली.

शंकरराव मोहिते-पाटील हे गरीबांवरती अन्याय होत असेल तर त्याला त्वरीत न्याय मिळवून देत असत. त्यात ते स्वत: गावचे पाटील होते. त्यामुळे त्यांचा अधिकाऱ्यावरती एक प्रकारचा दबाव असे. एकदा त्यांच्या गावातील एक दलित व्यक्ती नामा पवार याची जमीन बापू पवार याने तलाठ्याला पैसे देवून आपल्या नावावरती केली होती. नामा पवारला दोनच एकर जमीन होती. त्यामुळे तो गाव सोडून जाण्याच्या विचारात होता. परंतु शेवटी पाटलांना सांगाव म्हणून तो शंकरराव मोहिते-पाटील यांच्याकडे बायका पोरं घेवून आला व तो आपले गाऱ्हाणे सांगू लागला. तेव्हा काकांनी शांतपणे त्याची बाजू ऐकून घेतली व लगेचच चल तलाठ्याकडे म्हणून नामा पवाराला घेवून गेले आणि तलाठ्याच्या ऑफिससमोर कोतवाल उभा होता. त्याला काका म्हणाले की त्यां बापू पवाराला पुढं घालून घेऊन या. तेव्हा कोतवालाने बापू पावाराला पुढे घालून घेऊन आल. त्यानंतर तलाठी व बापू पवार समोरासमोर उभे होते. तेवढ्यात काकासाहेबांनी बापू पवाराला दम भरला की, तलाठ्याला जमिन तुमच्या नावावरती करण्यासाठी किती पैसे दिले सांगा. तेव्हा बापू पवार गप्पच बसले. तलाठीच घाबरत म्हणाला की, "साहेब, माफ करा, चूक झाली, पोटापायी अन्याय केला. पुन्हा अशी चूक

नाही व्हायची. हे पहा तुमच्यासमोर कागद फाडतो, पुन्हा नाही होणार असं."[२] असे म्हणत तलाठयाने उतारा फाडला. बापू पवार खाली मान घालून उभा होता. नामाला काकांनी तुम्हाला असं करण शोभत नाही. तुम्ही गरीबाला मदत करायची सोडून अन्याय करता म्हणून त्यांनाही दम भरला व तालठ्याला बायकापोरांचा विचार करुन सोडून दिले. पण पुढे असं झालं तर याद राख म्हणून ते निघून गेले. अशाप्रकारे अनेक प्रकारच्या अन्यायाच्या ठिकाणी काकासाहेबांनी अनेकांची दु:खे कमी करण्याचा त्यांच्यापरीने प्रयत्न केलेला दिसून येतो.

**ग्रामीण भागातील महिलांचा विकास**

"ग्रामीण भागातील महिला स्वावलंबी व्हाव्यात, सहकाराचा फायदा त्यांना कळावा, स्वत:च्या पायावर उभे राहण्याची ताकद त्यांच्यात यावी म्हणून सहकारमहर्षिंनी सन १९७६ नध्ये गौरीशंकर महिला उद्योग सहकारी संस्था स्थापन केली. पापड, चटणी, लोणची इत्यादी घरगुती पदार्थ तयार करण्यात येवून अकलूजमध्ये ग्राहक भांडार तयार करण्यात आले. तसेच महिलांसाठी 'विजय प्रिंटींग प्रेस' चालू करण्यात आली असून सदर प्रेसमध्ये प्रिंटींग, बायडींग, कंपोझिंग इत्यादी सर्व कामे महिला करीत असतात. तळागाळातील गरीब महिलांना अर्थाजनाचे एक महत्त्वाचे साधन निर्माण केलेले आहे."[3] यातून त्यांचे महिला सबलीकरणाचे धोरण दिसून येते.

श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टची स्थापना सन १०७२ मध्ये करण्यात आली. ट्रस्टच्या माध्यमातून सन १९७२ च्या भीषण दुष्काळामध्ये सोलापूर जिल्हयातील ११ व पुणे जिल्हयातील इंदापूर तालुका या १२ तालुक्याध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. तसेच १९७५ मध्ये ट्रस्टद्वारे 'ग्रीन फिंगर्स स्कूल' हे रेसिडेन्सियल इंग्लीश स्कूल स्थापन करण्यात आले असून या स्कूलमध्ये महाराष्ट्रातील व राज्याबाहेरील सुमारे ३५० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

श्री शिवपार्वतीच्या आशिर्वादानेच या भागाचा विकास झाला आहे ही दृढ श्रध्दा सहकारमहर्षिंच्या मनामध्ये होती. त्यामुळे कारखान्याच्या जवळील इतिहासकालीन शिवपार्वती मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येवून आदर्श महाद्वार दर्शनी भागात श्री छत्रपती

शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारुढ पुतळा, उद्यान अशाप्रकारे हा परिसर सुशोभित करण्यात आला आहे.

"वीस कलमी कार्यक्रमांतर्गत कुटुंब कल्याण योजना राबविण्यात येवून स्टीलच्या भांड्यांचे वाटप करण्यात आले. वृक्षारोपण मोहिमेमध्ये सुबाभळीची ५० हजार व इतर १७ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. बेघरांसाठी घरकुल योजना, सभासदांसाठी बेरडवाडी, शंकर (नेवरे) भर्तरीनाथ, टणू, लुमेवाडी, बोराटवाडी, हनुमान चाकाटी व पदमाळे सराटी योजना व सामुदायिक विहीर योजना सुरु करण्यात आल्या."[४]

वरील सर्व ग्रामीण भागातील सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रातील इतर भागालाही मार्गदर्शक असे कार्य त्यांनी केलेले आहे.

**कामगारांसाठी राबविलेल्या विविध योजना**

शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास साधत असताना शेतमजूर व कारखान्यातील कामगारांसाठीही त्यांनी अनेक योजना राबविल्या असून आज ग्रामीण भागातील कामगारांची आर्थिक उन्नती झालेली दिसून येते. त्याचे श्रेय कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनाच दिले पाहिजे. कामगार पतसंस्थेची स्थापना सन १९६४ मध्ये करण्यात आली. त्यानंतर कारखान्यातील तांत्रिक कामगारांची जवाहर को-ऑप. इंजिनिअरिंग ॲण्ड मेकॅनिकल वर्कशॉप ही संस्था १९६९ मध्ये त्यांनी स्थापन केली. सन १९७३ मध्ये गिरिजा कामगार दूध उत्पादक सोसायटीद्वारे कामगारांना संकरीत गायी वाटप करुन जोडधंदा उपलब्ध करुन दिला. "कामगारांकरिता सन १९६९ मध्ये विजय गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. सदर गणेशोत्सव मंडळास जमिन देण्यात येऊन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून दरवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. त्यासाठी कामगारांकडून अगर कोणाकडूनही वेगळी वर्गणी गोळा केली जात नाही. विजय कुक्कुटपालन सहकारी संघ ही संस्था कामगारांच्या मालकीची असून त्याद्वारे कामगारांना आर्थिक लाभ होत आहे. कामगारांना व मजुरांना बरोबर घेऊन त्यांचा आर्थिक फायदा करुन देत असत."[५]

### पारंपरिक पद्धत

"सामाजिक सेवेचे बाळकडू त्यांना अगदी प्रथमपासूनच लाभले होते. घरची गरीबी असताना शिक्षणाकरीता म्हणून काही विद्यार्थी ठेवून घेण्याची त्यांची परंपराच होती. आणि म्हणूनच त्यांच्या घरचीही परिस्थिती बेताची असतानासुद्धा गरीबीतही ५ ते ६ विद्यार्थी त्यांच्या घरी शिक्षणासाठी असत. हीच परंपरा आजही पुढे त्यांच्या वारसांनी चालविलेली दिसून येते. सामाजिक जाणीव, देशभक्ती, चारित्र्य, सुसंस्कार व औदार्याचा सुरेख संगम म्हणजेच शंकरराव मोहिते-पाटील यांचे घराणे होय असे दिसून येते."[६]

### १९७२ च्या दुष्काळातील कार्य

"सहकारमहर्षिंच्या सामाजिक जाणिवेचा एक पैलू १९७२ च्या दुष्काळाच्यावेळी दिसून आला. दुष्काळाचे चटके सोलापूर जिल्हयात बसले. पाण्याचे हाल सुरु झाले. सर्व लोक दाहीदिशा पाण्यासाठी भटकंती करु लागले. याची जाणीव काकासाहेबांना झाली. तेव्हा त्यांनी सोलापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्याची व पुणे जिल्हयातील इंदापूर या तालुक्याला पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी स्वत: घेतली. पाण्याची वाहतूक करणारे टँकर विकत घेण्यासाठी 'शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट' उभाराला अन त्यातून बारा टँकर मिळविले. या सर्व टँकरच्या मदतीने पाण्याचे अविश्रांत वाटप केले. नंतर गरज पूर्ण होताच हे टँकर विकून टाकले. त्यातून तोटा न होता चार पैसे संस्थेचा नफाच झाला होता. अशाप्रकारे ऐन दुष्काळाच्या काळात त्यांनी पिण्याच्या पाण्याची सोय करुन अनेक लोकांचा दुवा मिळविला होतो."[७] त्यांनी अशा पद्धतीने सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने सतत काम केलेले दिसून येते. तसेच जनावरांनाही वैरण नव्हती तेव्हा जनावरांसाठी चारा छावण्या सुरु केल्या होत्या.

### शिवपार्वती आखाड्याची स्थापना

"शरीर व मन यांचा सुंदर मिलाफ म्हणजे सुखी जीवन. हे सुखी जीवन जगण्यासाठी प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असते. मल्लविद्या ही एक सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. ही मल्लविद्या जोपासण्यासाठी सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील

यांनी शंकरनगर येथे शिवपार्वती आखाड्याची स्थापना केली. या आखाड्यामध्ये अनेक 'महाराष्ट्र केसरी' किताबाचे मानकरी ठरलेले आहेत."[८]

दरवर्षी याठिकाणी सहकारमहर्षींच्या जयंतीनिमित्त भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रामध्ये एक भव्यदिव्य कुस्ती मैदान म्हणून शिवपार्वती आखाड्याचा उल्लेख केला जातो. या मैदानाचे वैशिष्ट्य म्हणजे अंतिम फेरीमध्ये आलेल्या मल्लांना जरी त्याने कुस्ती जिंकली नसली तरी त्यांना ठराविक रोख रक्कम दिली जाते. हे या कुस्ती मैदानाचे वैशिष्ट्य आहे. 'त्रिमूर्ती' चषक हा प्रथम क्रमांकाच्या कुस्ती जिंकणाऱ्या मल्लांना दिला जातो. अतिशय शिस्तबद्ध व कोणावरही अन्याय होणार नाही असे नियोजन केले जाते.

**गोरगरिबांचे दैवत**

दुष्काळी सोलापूर जिल्हा, नशीबावर हवाला ठेवून परमेश्वराची करुणा भाकत, डोळ्यात प्राण आणून पावसाकडे डोळे लावणाऱ्या गरीब असाहाय्य शेतकऱ्यांची शेती बागाईत करण्यासाठी, त्यांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी लिफ्ट इरिगेशनची योजना आखली. जिल्हा भूविकास बँकेमार्फत कर्जवाटप केले. भाग्याची गंगा शेतकऱ्यांच्या झोपडीच्या दारात आणून सोडण्याचे काम संपूर्ण महाराष्ट्रात सोलापूर जिल्हयात सर्वप्रथम शंकररावजींनी केले. शेतीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हा सुजलाम् सुफलाम् व्हावा हे त्यांच स्वप्न होते. त्याचबरोबर प्रत्येक हाताला काम मिळाले पाहिजे म्हणून फक्त शेतीवरच अवलंबून न राहता शेतीस पूरक उद्योग म्हणून त्यांनी शिवामृत दूधसंस्थेच्या रुपाने दुधाचा महापूर योजना आखली आणि कार्यान्वित केली. निश्चयाचा महामेरु असलेल्या या ध्येयवादी व्यक्तीने समाजाच्या स्थितीचा आणि गतीचा अचूक वेध घेत आपल्या कार्याची दिशा निश्चित केली. "जिद्दीच्या खंदया कार्यकर्त्यांचा संच निर्माण केला आणि विविध सहकारी उद्योगांचा पाया घातला. पाणी पुरवण्याच्या विस्तृत योजना आखल्या. जनकल्याणासाठी शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासाच्या योजना आखल्या आणि आपल्या कल्पक परिसरस्पर्शी व्यक्तिमत्त्वाने जनजीवन बदलून टाकले. ते गोरगरिबांचे, शेतकऱ्यांचे, तरुणांचे आणि पिडीतांचे दैवतच बनले. श्रध्दास्थान बनले."[९]

१९७१ साली सहकारमहर्षिंचे जेष्ठ सुपुत्र व महाराष्ट्राचे विद्यमान ग्रामविकास मंत्री विजयदादा व जेष्ठ कन्या जयश्रीताई यांचे लग्न झाले. या लग्नाला जवळजवळ एक लाखभर लोक आले होते. या लोकांची जेवणाची व्यवस्था अगदी पद्धतशीरपणे काकासाहेबांनी केली होती. हा लग्नसोहळा अगदी दिमाखात पार पडला. परंतु त्या विवाहामध्ये ज्या भोजनावळी घातल्या त्यामुळे शंकररावजी लक्षभोजनी म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांच्यावर चहूबाजूंनी टिका होऊ लागली. त्या समारंभाला यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते इत्यादी नातब्बर नेते हजर होते. याचे समर्थन शंकरराव मोहिते-पाटील व यशवंतराव मोहिते यांनी उघडपणे केले. भोजनावळीच्या बाबतीत शंकररावजींचा विचार साधा व सरळ होता. "जवळजवळ २५ ते ३० वर्षे सार्वजनिक क्षेत्रात काढल्यानंतर जिल्हयातील गावोगावच्या कार्यक्रमांना हजेरी लावून आणि लग्नापासून ते बारशापर्यंतच्या सर्व समारंभाना उपस्थित राहून जो लोकसंग्रह केला त्या सर्वांना आपल्याकडे बोलावून त्यांनी केलेल्या सत्काराची परतफेड करण्याचा विचार मी केला तर त्यात माझे काय चुकले?"[१०] असा स्वाल त्यांनी केलेला होता. यशवंतराव मोहितेंनी असे समर्थन केले की ज्यांना चार माणसे जोडता येत नाहीत त्या लोकांनी अशी टीका करणे योग्य नाही. शेकडो गावातीलच नव्हे तर जिल्हयातील घरगुती कार्यक्रमापासून सार्वजनिक कार्यक्रमापर्यंत ज्यांनी भाग घेतला त्यांनी घरातील पहिल्या वहिल्या कार्यक्रमाला सर्वांना निमंत्रित केले व जेवण दिले त्याच पोटशूळ का उठावा समजत नाही असे यशवंतराव मोहितेंना वाटत होते. शंकररावजींना कोणी विचारल की ते म्हणत पत्रकारांना खरा आकडा माहीतच नाही. एक लाख नव्हे तर एक लाख चाळीस हजर लोक लग्नाल जेवले असे ते सर्वांना अभिमानाने सांगत असत. यामध्ये सर्वाधिक माझे गोरगरीब शेतकरीच जास्त होते. त्यांना मी यानिमित्ताने चांगले जेवण दिले हे मी माझे समाजकार्यच समजतो असे त्यांचे ठाम मत होते.

**सामान्यांचे आशास्थान**

"ज्यांच्या कर्तृत्वसूर्याच्या किरणांचा प्रकाश सामान्य घरापर्यंत, शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत पोहचला होता ते शंकरराव मोहिते-पाटील होत. ज्यांनी आपल्या नित्य नूतन कल्पना लढवून समाजाला जीवनाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण करुन दिले.

सामान्यांच्या जीवनाला आकार दिला, त्यांनी लावलेल्या कर्तृत्ववेलीचा सुगंध महाराष्ट्रभर दरवळत आहे. ज्यांनी आश्वासनांची केवळ उधळण केली नाही तर त्यांची पूर्तता केली, ज्यांनी दुर्बलता झटकून देऊन, लाचारी फेकून देण्याचा मंत्र सांगितला असे काकासाहेबांचे कार्य होते."[११]

साहेबांच्याकडे कोणीही लहान वा मोठा पाहुणा आला तर ते स्वतः त्या पाहुण्याला संस्था फिरवून दाखवीत असत. तेथील कार्यपद्धतीविषयी माहिती देत असत. या कामाचा त्यांना कधी आळस नसायचा. पाहुण्याशी झालेल्या चर्चेतून एखादी नवीन योजना आपल्या भागात कशारितीने राबविता येईल याचा ते आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करुनच ते योजना राबवित असत. दरवर्षी किमान एक तरी योजना राबविलीच पाहिजे या गोष्टीवर त्यांचा कटाक्ष होता.

युवकांच्याविषयी त्यांच्या मनात फार मोठ्या अपेक्षा असत. युवकांना विधायक कामात गुंतवून त्यांना प्रगतीचा मार्ग मोकळा करुन देत असत. आजचा युवक हा या देशाचा उद्याचा जबाबदार शिस्तप्रिय नागरिक बनला पाहिजे असे त्यांना वाटे.[१२]

कब्बड्डी, आट्यापाट्या, लेझीम इ. ग्रामीण खेळांना त्यांनी उत्तेजन दिले. ते अनेकदा युवकांच्याबरोबर खेळात सहभागी होत असत व प्रेरणा देत असत.

"पंढरपूरला आषाढीला आळंदीहून निघालेल्या पालखीचे सदाशिवनगरला स्वागत करायची प्रथा साहेबांनी सुरु केली होती. पालखीचा सदाशिवनगरला रिंगणाचा कार्यक्रम ठेवण्यात येई. आळंदीहून निघालेल्या पालखीचे पहिले रिंगण सदाशिवनगरला भरत असे."[१३] उन्हातान्हात विठु माऊलीच्या ओढीनं पंढरीच्या वाटेला निघालेल्या त्या वारकऱ्यांचे स्वागत करायला ते स्वतः जातीने हजर असत. त्या पालखीतील माणसांची राहण्याची सोय करत व मोफत जेवणाचीही काकासाहेब व आक्कासाहेब जरवेळेस व्यवस्था करीत असत. गोरगरीबांमध्धे जी दरी होती ती कमी करण्यासाठी याचा उपयोग करीत.

"काकासाहेबांनी अकलूजमधील उध्दवस्त झालेला भूईकोट किल्ला असा सजवला की पुरातत्त्व खात्याने कौतुकच कराव. महाराष्ट्रात प्रेरणा देणारे असंख्य किल्ले आहेत. पण प्रेरणाही देणारा आणि आनंदही देणारा एकमेव किल्ला डौलाने उभा आहे तो महाराष्ट्रात फक्त अकलूजचाच आहे असे वाटते."[१४]

**माळशिरस तालुका जनसेवा युवक संघटना**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या काळात व सध्याच्या काळातही अनेक नेते स्वतःच्या नावाच्या संघटना किंवा विचारमंच काढण्यात सक्रीय असत. परंतु काकासाहेबांनी अशाप्रकारे स्वतःच्या नावावरती युवक संघटना स्थापन न करता गोरगरीब, सर्वसामान्य लोकांची समस्या सोडविण्यासाठी व विधायक राष्ट्रीय स्वरूपाचे कार्य आपल्या हातून घडावे या उदात्त हेतूने माळशिरस तालुक्यातील सर्व युवक वर्गाला आपल्या संघटन कौशल्याने गोळा करुन 'जनसेवा युवक संघटना' नावाची संघटना स्थापन केली. या जनसेवा युवक संघटनेचे ब्रीदवाक्य "जीवात जीवमान असेपर्यंत जनसेवाच करु" हे आहे.

सध्या या संघटनेचे सोलापूर जिल्हाभर कार्य चालू आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये शाखा स्थापन केलेल्या आहेत. या संघटनेमार्फत वृक्षारोपण, रक्तदान शिबीरे, मोफत शस्त्रक्रिया शिबीरे, वक्तृत्व स्पर्धा, गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे इत्यादी विधायक कामे चालू आहेत. या संघटनेच्या शिक्षण जनसेवा, शेतकरी जनसेवा, कर्मचारी जनसेवा, युवक जनसेवा व विद्यार्थी जनसेवा संघटना अशा विविध शाखा आहेत.

सध्या या संघटनेचे काम सोलापूर जिल्हा जनसेवा संघटनेचे संस्थापक मा. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. तसेच युवक नेते मा. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या कुशल नेतृत्वाच्या सहकार्याने या संघटनेचे काम अतिशय चांगल्या प्रकारे सुरु आहे.

**विजय-प्रताप युवा मंच**

"जहाजाबरोबर स्वतःला बुडवुन घेणारे कर्णधार जेथे असतात तिथेच बुडता देश वाचविणाऱ्या नाविकाच्या पिढ्या जन्म घेतात" या बाबा आमटे यांच्या वाक्याप्रमाणे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या विचाराचा वारसा घेवून व युवक हाच केंद्रबिंदू मानून महाराष्ट्र राज्याचे ग्रामीण विकास व पर्यटनमंत्री मा. ना. श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या विचाराने व मा. आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हयामध्ये शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक कार्यात ग्रामीण भागातील युवकांना योग्य मार्गदर्शन व अडचणीच्यावेळी मदत करणारे विजय-प्रताप युवा मंच ही कार्यशील सामाजिक संघटना १२ एप्रिल १९९४ पासून सोलापूर जिल्हयात कार्यरत आहे.

सामाजिक क्षेत्रात मंचाचे भरीव असे कार्य म्हणजे "श्रमदानातून जलसंधारण" उपक्रमातून ५ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २००१ या काळात फडतरी या गावी ६ हजार युवकांच्या मदतीने ६०.०० लाख लिटर पाणी क्षमतेचा मातीचा बंधारा बांधून तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. त्याचबरोबर प्रगतीच्या दिशेने दुसरे पाऊल म्हणजे जळभावी या ठिकाणी हजारो कार्यकर्त्यांच्या मदतीने ८०.८० लाख लिटर पाणी क्षमतेचा मातीचा बंधारा ५ सप्टेंबर ते ९ सप्टेंबर २००२ या कालावधीत बांधलेला आहे. तसेच ११ फेब्रुवारी २००३ ते २० फेब्रुवारी २००३ अखेर मोफत सर्वरोगनिदान व उपचार शिबीर घेण्यात आले. सुमारे ६ हजार रुग्णांनी याचा लाभ घेतला व मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

प्रतिवर्षी शैक्षणिक, कला क्रीडा, एन. सी. सी. इत्यादी क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्या संपादन केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मंचतर्फे "विजय-प्रताप गौरव पुरस्कार" मानचिन्ह व मानपत्र देवून गौरविण्यात येते. यामध्ये १९९६-९७ साली ४०पुरस्कार, १९९७-९८ मध्ये ६० पुरस्कार, १९९८-९९ मध्ये ६५ पुरस्कार, १९९९-२००० मध्ये ७० पुरस्कार, २००१-०२ मध्ये ५८ पुरस्कार, २००२-०३ मध्ये ६० पुरस्कार देवून विजय-प्रताप युवामंचने विभूषित केले आहे.

एड्स, गुटखा बंदी याविषयी मार्गदर्शन शिबीरे घेवून शाळा व सरकारी कार्यालये या ठिकाणी गुटखा विकण्यास परवानगी देवू नये याकरीता मा. आ. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील व मा. श्री. धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी तहसिल कार्यालयावर मोर्चा नेवून प्रतिबंध करणेविषयी विशेष प्रयत्न केले. त्याचेच पडसाद म्हणून महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट २००२ पासून संपूर्ण महाराष्ट्रात गुटखा बंदी लागू केली. वृक्षारोपण करण्याचे बाबतीत मंचाने पुढाकार घेवून विजयनगर विझोरी या ठिकाणी तळ्याच्याभोवती वृक्षारोपण केले. अकलूज येथील नवीन बसस्थानकावर ३००० वृक्षांचे रोपण मंचाने केले.

तळागाळातील समाजातील मुले जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत येत असतात. उच्च व मध्यमवर्गीय समाजातील मुले खाजगी शाळेमध्ये जातात याचे कारण खाजगी शाळांमध्य विविध सुविधा उपलब्ध असतात. मुलांचा व पालकांचा ओढा त्याकडे जास्त असतो. या सर्व सुविधा जिल्हा परिषद शाळांना उपलब्ध करुन दिल्या तर जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावरणार आहे हे जाणूनच समाजातील विविध शिक्षणप्रेमी नागरिक, संस्था यांच्या सहकार्याने विजय-प्रताप युवा मंचाने ५८९ बेंचेस (रु. ३.५ लाख) वाटप केलेले आहे. त्याचबरोबर माहिती व तंत्रज्ञान याचे जुजबी ज्ञान अवगत होण्यासाठी अकलूज केंद्रास संगणक (रु. ४०,०००/-) भेट देण्यात आलेला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही अशा शाळांना पाण्याची टाकी व नळयोजना करुन दिली आहे. विद्यार्थ्यांसाठी सामान्यज्ञान परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन, प्रयोग प्रात्यक्षिक, बालसंस्कार शिबीरे तसेच कला-क्रीडा, वक्तृत्व, कथाकथन, लोकनृत्य असे विविध उपक्रम मंच राबवित आहे.

समाजातील शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शाळाबाह्य मुलांचे वर्ग मंच चालवित आहे. आगामी काळात शिक्षकांना प्रोत्साहनपर "दादोजी कोंडदेव पुरस्कार" स्वच्छ सुंदर शाळा यासाठी "रत्नाई पुरस्कार" सुरु केलेले आहेत. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात विजय-प्रताप युवा मंच ही संघटना निरपेक्ष हेतूने काम करीत आहे.

मा. ना. श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या एकसष्टीनिमित्त सोलापूर जिल्हयामध्ये विजय-प्रताप युवा मंचच्या माध्यमातून गजढोल, लोकनृत्य, वक्तृत्व, निबंधलेखन, चित्रकला, कब्बड्डी, खो-खो, कुस्ती, शरीरसौष्ठव, बुद्धीबळ, हॉलीबॉल, मॅरेथॉना, मोटोक्रॉस, बैलगाडी, सायकल, भावगीत गायन, जलतरण आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले.

दिनांक २६ व २७ नोव्हेंबर २००४ रोजी विजय-प्रताप युवा मंचने व्यक्तिमत्त्व विकास शिबीर आयोजित केले. यामध्ये ३०० शिबीरार्थीनी उपस्थिती नोंदविली. सुशिक्षित बेरोजगार व महिला बचत गट यांचा ताजू प्रशिक्षण मेळावा दि. ९-३-२००५ रोजी आयोजित करण्यात आला होता. तसेच महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ११-४-२००५ रोजी १० वी व १२ वी नंतर पुढे काय? या विषयावरती प्रा. दिपक ताटपुजे, व्यवसाय मार्गदर्शक व विज्ञानलेखक, सातारा यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

**शेतीविषयक कार्य**

**कृषि सम्राट**

जिल्हयातील सत्तेची केंद्रे सहकारमहर्षिनी सामान्यांच्या विकासासाठी वापरण्याकरीता स्वीकारली होती. माजी पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी जाहीर केलेल्या २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी त्यांनी उत्तररीतीने महाराष्ट्रात कार्यान्वित केली. त्यांचा शेतीचा अनुभव व अभ्यास फार मोठा होता.[१५] त्यांची शेतीवरील व्याख्याने गाजली व त्यांनी "कृषि सम्राट" म्हणून शेतीमध्ये गौरवाचे स्थान प्राप्त करुन घेतले. तसेच शैक्षणिक सोई उपलब्ध करुन दिल्या. साखर कारखान्याच्या निर्मितीबरोबर औद्योगिक विकासाचेही दालन त्यांनी वाढविले. प्रत्येक तालुक्यात साखर कारखाना उभा करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला.

त्यांनी हळुहळु आपले कार्यक्षेत्र जिल्हयाच्या बाहेर संपूर्ण महाराष्ट्र असावे असे ठरविले व त्याप्रमाणे शेतीवर व जोडधंदयावर विशिष्ट शैलीतील त्यांची व्याख्याने सर्व महाराष्ट्रात आखली गेली. प्रचंड जनसमुदाय मंत्रमुग्धपणे त्यांच्या व्याख्यानाकडे आकृष्ट

होवू लागला. पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत स्वानुभावावर व अभ्यासपूर्ण अशी आकडेवारी दिलेल्या माहितीने सुशिक्षित समाजसुद्धा आश्चर्यचकित होत असे. विधायक निष्ठावान कार्यकर्त्याची त्यांना पारख फार चांगली होती. त्यांच्यामागे कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण झाले. त्यांनी त्यात चांगला समन्वय निर्माण केलेला होता. सामान्य कार्यकर्त्यांच्या मागे आपली शक्ती उभी करुन त्यांच्याकडून ते विधायक कार्य करुन घेत.

**शेतीला जोडधंदा मिळवून दिला**

शंकरराव मोहिते-पाटील यांनी संकरीत गायींच्या पैदाशी उभ्या केल्यावर आणि राजहंस कुक्कुटपालन संघ सुरु केल्यावर शंकरराव मोहिते-पाटील असे सांगत की, आमच्या गरीब शेतमजुरांना, कामगारांना छोट्या छोट्या शेतमजुरांना आम्ही संकरीत गायी घेवून दिल्या आहेत. गायीच्या खुराकाची व्यवस्था केली आहे. दूध संकलन करुन ते विक्रीसाठी पाठविण्याची व्यवस्था केली आहे. दूध उत्पादक सहकारी संघ स्थापन करुन त्याचे सभासद नोंदविले. या संस्थेचे प्रथम कसेबसे १०२ सभासद झाले. नंतर ते वाढत गेले चौदा लक्ष भागभांडवल होते. या संस्थेची आजची सुमारे ८ कोटी रुपयाहून अधिक उलाढाल पहावयास शंकरराव मोहिते-पाटील हयात नाहीत. शेतीबरोबर जोडधंदा मिळावा, चार पैसे अधिक मिळावेत म्हणून शंकररावांची सारखी धडपड चालायची. राजहंस कुक्कुटपालन संघ स्थापन करणे हासुद्धा शंकरराव मोहिते-पाटलांचा दृष्टीकोन होता. हा व्यवसाय शास्त्रशुद्ध पद्धतीने चालवून अंड्याची विक्री करुन दिली आणि चार पैसे मिळवून दिले.[१६] महिलांसाठी कामगारांसाठी सहकारी संस्था उभ्या करुन त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्याबाबतचा आत्मविश्वास निर्माण करुन दिला.

महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे तसे अत्यल्प आहे व त्यामुळे इथे पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब हा शेतीच्यादृष्टीने मोलाचा आहे हे शंकररावजींनी पूर्णपणे ध्यानी घेतले होते. त्यामुळे त्यांनी शासनाकडे आग्रह धरला की महाराष्ट्रात पडणारा पाऊस हा शेतकऱ्यांच्यादृष्टीने अत्यंत मोलाचा असून तो शेतीसाठी उपयुक्त झाला पाहिजे. म्हणून त्यांनी नदी, ओढे, नाले अशा ठिकाणी काळ्या मातीचे बंधारे घालून वाहून जाणारे

पाणी अडविले व त्या पाण्यावर यशस्वी शेती करुन दाखविली. पूर्वी जीवनात जे दुष्काळाचे चटके बसले होते त्याचे प्रत्यंतरच त्यांच्या या कामगिरीत दिसते.

व्यक्तिची, कुटुंबाची आणि समाजाची सर्वांगिण उन्नती होण्यासाठी त्या व्यक्तिची, कुटुंबाची व समाजाची आर्थिक स्थिती मजबूत पाहिजे. समाजातील सर्व घटकांची आर्थिक सुबत्ता प्रस्थापित करावयाची असेल तर जिथं तो प्रमुख धंदा त्यास चालना देऊन त्या धंदयास उर्जितावस्था आणावयास हवी. आपला प्रमुख धंदा शेती, पण तो पिकवणारा शेतकरी पिढ्यानपिढ्या दारिद्र्याने, अज्ञानाने पिचलेला होता. तो जे काही शेतात पिकवित असे ते मातीमोलाने विकलं जात होते. शेतकृयांने पिकवलेल्या मालास किंमत नव्हती. शेतकऱ्यांच्या श्रमाला, त्याने गाळलेल्या घामाला मोल नव्हतं. मोल होतं फक्त दलालांच्या श्रमाला, त्यांचे हात ओले होत होते, पण शेतकरी मात्र कोरडाच होता. अशी ससेहोलपट होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या जीवनातील दु:खाची जाणीव आणि त्याबद्दलची सहानुभूती सर्वांना असते. पण त्या दु:खाची तीव्रता प्रतीत होऊन ती दु:खे मुळासकट उपटून काढण्याची दृष्टी आणि जिद्द धरली ती फक्त शंकररावजी मोहिते-पाटील यांनी. या देशात आपआपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी विविध संघटना अस्तित्वात आल्या. मात्र शेतकऱ्यांची संघटना नव्हती. तेव्हा शंकररार्जींनी हे पाहिले आणि महाराष्ट्रात शेतकरी संघटना सर्वप्रथम स्थापन केली. शेतकऱ्यांची संघटना असल्याशिवाय शेतीमालाला योग्य किंमत मिळणार नाही. आज शेतकऱ्याला जे काही थोडेफार सुखाचे दिवस आले आहेत त्याचे श्रेय शंकररावजींचया शेतकरी संघटनेच्या कल्पनेतच आढळून येते. यातून शंकररावांचा द्रष्टेपणा जाणवतो. [१७]

## सामुदायिक विहीर योजना

शेतकऱ्यांची कष्ट करण्याची नेहमीच तयारी असते. पण ज्या शेतीवर तो कष्ट करणार आहे ती शेती मात्र अनियमित, अनिश्चित व अपुऱ्या पावसावर अवलंबलेली असते. म्हणून शेतकऱ्यांच्या दृष्टीची दिशाच बदलली व ती विपुल पाणी असलेल्या नदया, नाले आणि सहकारावर वळविली. सहकाराला स्पर्श करुन नदया-नाले यावर उपसा जलसिंचनाच्या योजना आखल्या आणि त्या योजना धडाडीने कार्यान्वित केल्या. तहानलेली

जमीन पाण्याने तृप्त झाली. त्या तृप्त जमिनीतून बारमाही पिके डोलू लागली. शेतकऱ्यांचे आर्थिक जीवन त्या डोलणाऱ्या पिकातून उभे राहिले. सर्वच शेतकऱ्यांच्या जमिनींना नदया नाल्यांचे सानिध्य असत नाही. ते शेतकरी प्रत्येक शेतावर स्वतःच्या मालकीची विहीर खोदून बागायती शेती करु शकत नाहीत. ते खर्चिक तर आहेच शिवाय खोदलेल्या विहीरीस पाणी लागेलच याची खात्री नाही. असे शेतकरी शंकररावजींनी गोळा केले. ज्या ठिकाणी भरपूर पाण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी "सामुदायिक विशाल विहीर" खोदली तर समस्या दूर होईल. कमीत कमी पैसा व श्रम वापरुन जास्तीत जास्त जमिन पाण्याखाली आणून बारमाही पिके काढणे शक्य होईल. ही सामुदायिक विशाल विहीरीची कल्पना सर्वप्रथम सुचली ती शंकररावजी मोहिते-पाटील यांना. ज्याच्या हदयात भूकेने तडफडणाऱ्या बांधवांकडे पाहून भावनेचे कड येतात त्या भावनेच्या कडातूनच अशा सामाजिक हिताच्या कल्पना सुचतात आणि सुचलेल्या कल्पना साकार होतात. सामुदायिक विशाल विहीरीची कल्पना या महाराष्ट्रात सर्वप्रथम शंकररावजींनीच साकार केली आणि तीसुद्धा माळशिरस तालुक्यातील पानीव गावाच्या शिवारात. छोट्या मोठ्या शेतकऱ्यांना एकत्रित आणले. त्यांना प्रेरणा दिली आणि सर्वतोपरी सहाय्य करुन पहिली "सामुदायिक विशाल विहीर" शंभर टक्के यशस्वी केली. शंकररावजींच्या नेतृत्वाने आणि कर्तृत्वाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. त्यांच्यात आत्मविश्वास वाढला आणि अनेक सामुदायिक विशाल विहीरी एकामागून एक शंकररावजींच्या प्रेरणेने निर्माण झाल्या. जो निर्माण करतो तोच खऱ्या अर्थाने जगत असतो. साऱ्या महाराष्ट्रात मोहिते-पाटील यांची प्रशंसा झाली.[१८]

शेती सुधारणेच्या बाबतीत सोलापूर जिल्हा भूविकास बँकेमार्फत सामुदायिक विशाल विहीरीची योजना राबविण्यात आली. त्यामुळे सोलापूर जिल्हयाच्या विकासाच्यादृष्टीने ती फार उपयुक्त ठरली. शंकररावजींच्या कल्पनेचे संपूर्ण महाराष्ट्रभर कौतुक झाले. आकाशवाणी पुणे केंद्राने दखल घेवून शंकररावजींची एक प्रदीर्घ मुलाखत घेवून ती आकाशवाणीवरुन प्रसारित केली.

एखाद्या शेतकऱ्याच्या विहीरीत पाण्याचा साठा मिळाल्यास त्या पाण्याचा त्याला थोडाफार उपयोग होतो. परंतु जिरायत भागातील शेतीमध्ये काढलेल्या विहीरीचे पाण्यामधून तीन एकर किंवा जास्तीत जास्त चार एकर एवढेच जमिन बारमाही बागायतीखाली येऊ शकते. म्हणजेच तीन किंवा चार एकर एवढीच जमीन बारमाही बागायती करण्यासाठी शेतकऱ्यास विहीर खोदण्यासाठी १० ते १२ हजार रुपये लागतात तर इंजिन किंवा मोटारसाठी ५ ते ६ हजार रुपये आणि पाईपलाईन, कनेक्शन इत्यादी कामासाठी २ ते ३ हजार रुपये असे एकूण १८ ते २० हजार रुपये खर्च करावे लागतात. म्हणजेच एक विहीर पूर्ण करण्यासाठी भांडवली खर्च २० हजार रुपये येतो आणि बागायती जमिन फक्त तीन चार एकर होते. परंतु सामुदायिक विशाल विहीरीच्या कल्पनेतून जर शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन एका ऐवजी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बागायती करण्याचेदृष्टीने विचार केला तर भांडवली स्वरूपाचा खर्च फार कमी येतो. माणसांची श्रमशक्ती कमी लागते. भूगर्भातील पाण्याचा अंदाज घेवून ज्या जमिनीत पाणी असेल अशा जमिनीत विहीर खोदल्यामुळे भरपूर पाणी उपलब्ध होऊ शकते. आणि विशेष महत्त्वाचा भाग म्हणजे या सामुदायिक विशाल विहीर योजनेमध्ये भाग घेणारा अल्पभूधारक एरव्ही अपुऱ्या तारणामुळे आपल्या शेतीचा विकास करु शकत नाही. असा शेतकरीसुद्धा या योजनेत सहभागी झाला तर बागायतदार होऊन सुखी आणि संपन्न बनू शकतो. अशी ही नवीन सामुदायिक विशाल विहीरीचे योजना असल्याने शेतकऱ्यांची सामुदायिक विशाल विहीरीची योजना असल्याने शेतकऱ्यांची सामुदायिक विशाल विहीरीद्वारे शेती सुधारणा करण्याचे ठरविल्यास त्यांचा अधिकाधिक कमी खर्चात भरपूर फायदा होतो.[१९]

अशा सामुदायिक विहीर योजनेसाठी भूविकास बँकेमार्फत कर्जपुरवठा करण्याचे धोरण मध्यवर्ती भूविकास बँकेने आखले आहे आणि त्याप्रमाणे कर्ज वितरण सुरु झाले आहे. त्यामुळे अशा योजना राबविण्यात शेतकऱ्यांना आर्थिक अडचण येणार नाही.

अशाप्रकारे ही सामुदायिक विशाल विहीरीच शेतकऱ्यांच्या कल्याणाची व आर्थिक स्थैर्याची योजना आहे. ही योजना शेतकऱ्यांनी राबवून स्वतःचे हित साधावे व धान्योत्पादनात वाढ करुन राष्ट्राच्या विकास कार्यक्रमास हातभार लावावा असे शंकररावजींनी शेतकऱ्यांना नम्रपणे आवाहन केले. या आवाहानाला प्रतिसाद म्हणून शेकडो

शेतकऱ्यांनी या सामुदायिक विशाल विहीर योजनेचा लाभ घेतलेला आहे व सध्या लाभ घेत आहेत. यातूनच शंकररावजींचे हरितक्रांतीचे स्वप्न साकार होत आहे.

**विदेशी प्रयाण**

शंकरराव हे हाडाचे शेतकरी होते. त्याचबरोबर शेतकरी वर्गाबद्दल त्यांच्या अंत:करणात तळमळ होती. प्रत्येक शेतकऱ्याचे जीवन समृद्ध व संपन्न झाले पाहिजे. त्यासाठी शासनाच्या विविध योजना राबवून त्या शेतकऱ्यांच्या दारापर्यंत घेऊन जात असत. अशातच मुंबईहून मराठा चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेकडून एक पत्र आले. जपानमध्ये सुरु असलेल्या विस्तीर्ण अशा शंभर दोनशे एकाराच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन 'एक्स्पो ७०' भरवले होते. या प्रदर्शनाला जाणाऱ्या लोकांची व्यवस्था मराठा चेंबर ऑफ कॉमर्समार्फत होईल या आशयाचे ते पत्र होते. मात्र या जपानच्या १५ दिवसांच्या दौऱ्यासाठी प्रत्येकी साडेसात हजार रुपये दयावे लागणार होते. ही आपणास परदेशाला जाण्याची संधी चालून आलेली आहे असे सहकारमहर्षिंना त्यांच्या सहकाऱ्यांनी पटवून दिले व सहकारमहर्षि त्यांच्या पत्नी रत्नप्रभादेवी व ज्येष्ठ चिरंजीव विजयसिंह यांच्यासह सोळापण जपानला प्रदर्शनासाठी गेले होते. तेथे औद्योगिक प्रदर्शनामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीची प्रत्यक्ष पाहणी त्यांना करता आली व शेतकऱ्यांना कशाप्रकारे त्याचा उपयोग होईल याचा अभ्यास केला.[२०]

यावेळी सहकारमहर्षिनी जपानच्या शेतकऱ्यांची भेटही घेतली. त्यांच्या शेतावरती साहेब गेले. जपानी शेती पाहिली. जपानचा शेतकरी पाहिला. आपल्याप्रमाणे त्यालाही अडचणी होत्या. पण जपानचा शेतकरी आपल्यापेक्षा प्रगत असल्याची त्यांना जाणीव झाली. यंत्राद्वारे विविध मशागती तो करीत होता. संकरीत बियाणे, रासायनिक तसेच कंपोस्ट खतांचा वापर, शेतीला जोडधंदयाची साथ, मुख्य म्हणजे शेतकऱ्यांच्या अडीअडचणींचा शासन आत्मीयतेने विचार करत होते.[२१]

सहकारमहर्षि भारतात परतल्यावर भारतीय शेतकऱ्याची व जपानी शेतकऱ्याची तुलना करीत होते व आता आपण शेतकऱ्यांसाठी काय करायचे यासाठी प्रयत्न करु लागले. शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास भाग पाडले.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

### सामान्य माणसाविषयी तळमळ

दिवसरात्र आमचा शेतकरी शेतात राबतो आणि अधिक उत्पन्न काढतो. परंतु त्याच्या मालाला वाजवी भाव मिळत नाही आणि त्यामुळे आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही. म्हणून कृषि उत्पादनास वाजवी भाव मिळावयास पाहिजेत असे ते सातत्याने सांगत असत. धान्योत्पादनात वाढीवर चर्चा करीत असताना ते पोटतिडकीने सांगत की, अन्नधान्याचे उत्पन्न आम्ही दुपटीने काढून देऊ, परंतु सरकार आमच्या मालाला भाव कायदेणार ते सांगा? शेतीमालाला वाजवी भाव बांधून दयावेत. त्यामुळे कृषि उत्पादनात भरपूर वाढ होईल. शेतकऱ्यांची आर्थिक बाजू बळकट होईल. त्याचा विकास होईल आणि सर्व ग्रामीण जनतेला स्वराज्यात सुख समाधानाने, बंधूभावाने, गुण्यागोविंदाने राहता येईल. ही खरोखर त्यांची सामान्य माणसाविषयीची भूमिका आणि तळमळ होती. ती साध्य करण्यासाठी ते अहोरात्र अकलूज पंचक्रोशीतील सामान्य शेतकऱ्यापासून ते कर्मचारी, अधिकारी वर्ग या सर्वांना सहकारमहर्षिनी सतत मार्गदर्शन केले. सढळ मदत केली. अडीअडचणीच्या प्रसंगी धीर देवून त्यांच्या पाठीवर मायेचा हात फिरवून रंजल्या गांजल्यांचे अश्रू पुसण्यास मदत केली. सामान्य माणसाच्या विकासासाठी त्यांनी महान परिश्रम केले आणि म्हणूनच अकलूजच्या पंचक्रोशतील प्रत्येकाच्या घरात एक स्फूर्तिस्थान म्हणून त्यांची प्रतिमा आपणास आजही पहावयास मिळते.

### हरितक्रांतीबरोबर धवलक्रांती

शेतामध्ये त्यांनी अनेक नवनवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व संकरीत बी-बियाणे यांचा वापर करुन शेतीमध्ये प्रचंड उत्पन्न वाढविले व सर्वसामान्य शेतकऱ्यांनाही अशा पद्धतीने उत्पन्न वाढविण्यास मदत केली आणि हरितक्रांतीच घडवून आणली.

शेतीबरोबर जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाला त्यांनी महत्त्व दिले. १९७० मध्ये त्यासाठी त्यांनी बेंगलोरहून महाराष्ट्रात सर्वप्रथम जर्सी गायी आणल्या व त्या गाईपासून किती फायदा होतो हे स्वतः अनुभवले. नंतर इतर शेतकऱ्यांना त्या गायी घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व त्या गायींचा फायदा किती प्रमाणात होतो हे ग्रामीण भागातील लोकांना समजावून दिले. ते स्वतः माळशिरस तालुक्यातील मोठमोठ्या गावात जाऊन

बाजारादिवशी या गायींचा प्रचार करीत असत. दोन तीन गाड्यासमवेत प्रचाराचे काम साहेब करीत असत. त्या गाड्यावरती "पाळाल जर्सी तर जीवनात सरशी", "ज्याच्या घरी जर्सी गाय त्याच्या घरी लक्ष्मीचे पाय", "शेतात खत, घरात ऐपत, बाजारात पत" अशाप्रकारचे आकर्षक बोर्ड रंगवलेले असत. त्यानंतर काकासाहेब स्वतः भाषण करीत की, या गाईपासून दूध किती निघते? या गायीला चारा काय लागतो? ही गाय घ्यायला तुम्हाला कर्ज कसं मिळेल? व या गायीचे दूध तुमच्याकडून डेअरी कशी घेईल? तसेच डेअरीच्या पैशातून कर्जाचे पैसे वळते करुन चार पैसे तुमच्या पदरात कसे पडतील? अशाप्रकारे सर्व समस्येची त्यांना जाणीव होती. म्हणून ते ही सर्व माहिती आपल्या सोप्या व साध्या भाषेमध्ये शेतकऱ्यांना पटवून देत.

तसेच या प्रचाराला भगिनीसुद्धा भरपूर प्रमाणात जमत. त्यामुळे ते भगिनींना सांगताना स्वतःचे उदाहरण देत. माझी पत्नी कालपर्यंत माझ्याकडे माहेरला मुलगी आलीय, तिला काय करायच, त्यासाठी पैसे मला मागायची. पण आज माझ्याकडे गायी आल्यापासून व दुधाचा धंदा सुरु झाल्यापासून माझी पत्नी मला विचारायलासुद्धा येत नाही. उलट मीच बाहेर जाताना तिच्याकडे पैसे मागतो. असे ते महिलांना पटवून सांगत व स्त्रियासुद्धा हा व्यवसाय सहजपणे करु शकतात असे ते स्त्रियांना सांगत असत. सहकार क्षेत्रात स्त्रियांना सहभागी करुन घेत असत. काकासाहेब म्हणत की, "एक गाय म्हणजे एका मामलेदाराएवढा पगार. एक गाय म्हणजे एका मामलेदाराला जेवढा पैसा मिळतो तेवढा पैसा. दोन गाई म्हणजे प्रांत आणि तीन गाई म्हणजे कलेक्टर. मग बोला तुम्हाला मामलेदार व्हायच? का प्रांत व्हायच? का कलेक्टर? .

अशा पद्धतीने काकासाहेब भाषण करीत व लगेच त्यांचे सहकारी लोक ट्रकमधून जर्सी गायी खाली उतरवत आणि लोकांसमोर त्या गायीची धार काढून १० ते १५ लिटर दूध काढून दाखवत. ते बघून लोक आश्चर्यचकित होत व गायी घेण्याचा पक्का निश्चय करत व काकांच्यावरती विश्वास ठेवून गाई खरेदी करत. अशाप्रकारे जवळजवळ प्रत्येक गावात घरोघरी जर्सी गाय सध्या दिसते आहे. त्याचे श्रेय हे सहकारमहर्षिंनाच दयावे लागते. अशाप्रकारे महाराष्ट्रात असा कृतीद्वारे प्रयोग करणारे काकासाहेब हे एकमेव होते. त्यामुळे ते धवलक्रांतीचे महाराष्ट्रातील जनक म्हणून ओळखले जातात.

महाशिवरात्र यात्रा महोत्सव समितीचेवतीने भरविण्यात येत असलेले कृषि, पशु व औद्योगिक प्रदर्शन

आपला देश हा प्रामुख्याने कृषिप्रधान देश आहे. निरनिराळ्या राज्यांमध्ये स्थानिक देवदेवतांच्या उत्सवानिमित्त यात्रा भरविण्याची इतिहासकालीन परंपरा आहे. त्यानुसार शंकरनगर, अकलूज परिसरातही शिवपार्वती मंदिर आहे. तेथे दरवर्षी पारंपरिक पद्धतीने यात्रा भरविण्यात येते. कुस्त्यांचा फड व मनोरंजनाचे कार्यक्रम याव्यतिरिक्त अन्य कोणताही कार्यक्रम राबवला जात नसे. ग्रामीण शेतकरी जनतेला कृषि औद्योगिक प्रगतीची माहिती यात्रेच्या माध्यमातून देण्याचे एकमेव ध्येय सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी डोळ्यासमोर ठेवून सन १९७० पासून "कृषि, पशु व औद्योगिक प्रदर्शन" भरविण्यास प्रारंभ केला.[२३] सन १९७० मध्ये पहिले ग्रामीण भागातील राज्यस्तरीय प्रदर्शन त्यांनी शिवपार्वती मंदिर परिसरामध्ये भरविले होते. त्यात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. एवढेच नव्हे तर अशाप्रकारचे कृषि, पशु व औद्योगिक प्रदर्शन दरवर्षी महाशिवरात्र यात्रा महोत्सवानिमित्त भरविण्यात यावे अशी एकमुखी मागणी या परिसरातील ग्रामीण जनतेने केल्यामुळे सहकारमहर्षिंनी दरवर्षी प्रदर्शन भरविण्याचा पायंडा पाडला आहे. आजतागायत ही प्रथा चालू आहे. प्रदर्शनाद्वारे कृषि, पशु व औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचे ज्ञान व माहिती मिळाल्याने परंपरावादी शेतकरी प्रयत्नवादी झाला व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करु लागला.

सन १९७० च्या राज्यस्तरीय प्रदर्शनानंतर पुन्हा सन १९७५ मध्ये भव्य राज्यस्तरीय प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचा लाभ परिसरातील लाखो लोकांनी घेतला होता. दरवर्षी छोट्या प्रमाणात प्रदर्शन भरविण्याची प्रथा कायम चालू आहे.

यात्रा व यात्रेनिमित्त प्रदशर्न हे माध्यम प्रसिद्धीच्यादृष्टीने ग्रामीण जनतेचे मुख्य माध्यम आहे. सन १९७० पासून दरवर्षी आजतागायत कृषि, पशु व औद्योगिक प्रदर्शनाचा लाभ ग्रामीण भागातील लाखो शेतकरी बांधवाना झालेला आहे. अकलूज परिसरातील शेतकरी म्हणजे प्रगतीशील शेतकरी असेही बोलले जाते. त्यांचे पग्रतीचे एकमेव कारण म्हणजे या प्रदर्शनामधून त्यांनी घेतलेले ज्ञान व माहिती हे आहे.[२४] आज परिसरामध्ये

दिसत असलेला सामाजिक व आर्थिक बदल हा प्रामुख्याने कृषि व औद्योगिक क्षेत्रामध्ये झालेल्या प्रगतीमुळे झालेला आहे असे वाटते.

**शेतसारा कमी व्हावा म्हणून शेतकऱ्यांची चळवळ**

शेतकऱ्यावर वाढणारा शेतसारा कमी व्हावा आणि शेतकऱ्यावरील अन्याय दूर व्हावा यासाठी काकासाहेबांनी माळशिरस तालुक्यातील सदाशिवनगर येथे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा राज्यव्यापी मेळावा सन १९७० मध्ये आयोजित केला होता. ते स्वतः काँग्रेस पक्षात असूनदेखील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर शासनाच्या धोरणांशी स्वतः ते सामोरे गेले आणि शेतकऱ्यांच्या या प्रश्नासाठी प्रखर विरोध केला. "रोमणे" मोर्चा करण्याची कल्पना त्यांचीच होती.[२५] असा हा शेतकऱ्यांचा नेता शेतकऱ्यांवर होणाऱ्या कोणत्याही अन्यायाविरुद्ध शासनालासुद्धा विरोध करीत होता.

कारखान्याच्यावतीने भूमिहिनांसाठी घरे उपलब्ध करुन देणारा बहुधा महाराष्ट्रातील सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी कारखाना हा पहिला आहे असे दिसून येते. शासनाच्या धोरणाप्रमाणे माळशिरस तालुक्यात ६९६ घरे तर इंदापूर तालुक्यात ९० घरे बांधण्यात आली आहेत.

**शेती धंदयाला आधुनिक अर्थशास्त्रीय दृष्टीकोन**

शेती व शेतकरी यांच्याशी त्यांचे अतूट नाते होते. शेती धंदयाचा आधुनिक अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करुन आपल्या शेतकऱ्यांच्या स्थितीवर विचार करणारे फार थोडे शेतकऱ्यांच्या व शेती धंदयाच्या उद्धाराच्या विकासाच्या कल्पना असणारे त्याहून कमी असत. आपल्या शेतकऱ्यांत व्यावसायिक नेतृत्व जवळजवळ नाही म्हटले तरी चालेल. येथील बहुसंख्य जनता शेतकरी असल्यामुळे त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्याची कोणालाच गरज वाटत नव्हती. त्यामुळेच बहुसंख्य आमदार, खासदार, शेतकरी समाजातील असूनही केंद्र व राज्य सरकारच्या कारभारावर शेतकऱ्यांची छाप दिसत नव्हती, असे वारंवार काकासाहेब म्हणत. म्हणून या पार्श्वभूमीवर त्यांचे वेगळेपण उठून दिसते. शेतकऱ्यांचे ते खरेखुरे नेते होते. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्षपदी त्यांनी निवड एकमताने झाली होती.[२६] कै. शंकरराव मोहिते-पाटील हे स्वकर्तृत्वाने पुढे आलेले



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

एक महान नेते होते. सहकार हाच अपला जीवनधर्म मानून ते कार्य करीत असत. सुमारे पन्नास वर्षे त्यांनी एखाद्या श्रमयोगीच्या जिद्दीने व निस्पृहपणे न कंटाळता कार्य केले.

**शेतकऱ्यांबद्दल जिव्हाळा**

शेतकऱ्यांना काकासाहेब समजावून सांगत की, आपल्याला स्वराज्य मिळूनही खेड्यातील शेतकरी सुखासमाधानाने जगू शकत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. राज्यकर्त्यांचे अद्यापही लक्ष ग्रामीण भागाच्या विकासाकडे गेले नाही ही खरोखरीच चिंतेची बाब आहे. आपला मुद्दा खुमासदारपणे मांडण्याची त्यांची पद्धत अतिशय वाखाणण्याजोगी होती. आपले म्हणणे पटवून देताना ते छोटेसे चुटके सांगून ऐकणाऱ्यावर छाप पाडीत.[२] उदाहरणार्थ एक छोटे खेडेगाव होते, गावचा आठवड्याचा बाजार नदीपलीकडच्या गावी भरत असे. नदीच्या पलीकडे जाण्यास नावेची व्यवस्था होती. बाजाराला आजूबाजूचे लोक नेहमीच जात असत. बाजार सकाळी भरत असल्यामुळे आदल्या रात्री माल विकण्यासाठी नावेत भरुन नदीच्या पलीकडे जावयास निघत असत. वास्तविक नदीच्या पलीकडे जाण्यास अर्धा ते पाऊस तास लागत असे. नावेत माल ठेवल्यावर रात्रभर नाव चालूनही पहाटेपर्यंत बाजाराच्या गावी पोहचलीच नाही. उजाडल्यावर पाहिले तर आपल्याच गावाच्या नदीच्या किनाऱ्यावर नाव दोराच्या सहाय्याने खुंटीला बांधून ठेवली होती. त्यामुळे नदीच्या पलीकडे जाणे शक्यच नव्हते. तशाच प्रकारे स्वराज्य मिळूनही बराच कालावधी झाला तरी लोकांच्या प्रगतीची नाव अद्याप पलीकडच्या तीरावर गेली नाही ही खरोखरच खंत आहे.

दिवसरात्र आमचा शेतकरी शेतात राबतो आणि अधिक उत्पन्न काढतो. परंतु त्यांच्या मालाला वाजवी भाव मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही. म्हणून कृषि उत्पादनास वाजवी भाव दयावयास पाहिजेत असे ते सातत्याने सांगत असत. धान्योत्पादन वाढीवर चर्चा करीत असताना ते पोटतिडकीने सांगत की, "अन्नधान्याचे उत्पन्न आम्ही दुपटीने काढून देऊ. परंतु सरकार आमच्या मालाला काय भाव देणार हे सांगा?[२७] सरकारने सध्या हायब्रीड ज्वारीला ७४ रुपये क्विंटल भाव बांधून दिला आहे. म्हणजेच आमची ज्वारी मुंबईकरांना ७४ पैसे किलो भावाने विकायची. परंतु मुंबईकर भांडी घासावयाची राख दीड रुपया किलोने विकत घेतात.

म्हणजे आमचा शेतीमाल कवडीमोलाने विकाला लागतो. हा केवढा मोठा अन्याय आमच्यावर होत आहे." म्हणून ते सातत्याने सरकारपुढे आग्रहाची मागणी करीत असत की, शेतीमालाला वाजवी भाव बांधून दयावेत. त्यामुळे कृषि उत्पादनात भरपूर वाढ होईल. शेतकऱ्यांची आर्थिक बाजू लवकर बळकट होईल. त्यांचा विकास होईल आणि सर्व ग्रामीण जनतेला स्वराज्यात सुखासमाधानाने, गुण्यागोविंदाने राहता येईल. ही त्यांची सामान्य माणसाविषयीची भूमिका आणि तळमळ होती. ती साध्य करण्यासाठी ते अहोरात्र झटत असत.

## सिलींग कायदा

जमिनीच्या सिलींग कायदयामुळे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायास वाचा फोडण्यासाठी साहेबांनी सदाशिवनगर येथे राज्यातील शेतकऱ्यांची परिषद घेतली व शहरी मालमत्तेवर तसेच खाजगी कारखानदारीवर सिलींग नाही[२९] व शेतकऱ्यांसाठी सिलींग कायदा हे अन्यायकारक आहे असे साहेबांनी परिषदेत निर्भिडपणे स्पष्ट केले. ते अखंडपणे शेतकरी व शेतमजुरांसाठी झटले. शेतकऱ्याची दु:खे काय आहेत हे त्यांनी स्वतः अनुभवले होते. त्यामुळे त्यांनी सिलींग कायदयाला त्यांच्या पक्षाचे सरकार असताना विरोध केला. तसेच श्री. मोहन धारिया केंद्रीय मंत्री असताना त्यांनी शेतीसंबंधी केलेल्या एका विधानाला आव्हान देणारा एकच नेता अख्या महाराष्ट्रात होता. तो म्हणजे शंकरराव मोहिते-पाटील होय. अशाप्रकारे आपल्या तत्वाशी व निर्भिड बोलण्यास ते मागेपुढे पहता नसत.

## शेतकऱ्यांचा उद्धारकर्ता

कै. शंकररावजी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात सुराज्यासाठी धडपडणारे कार्यकर्ते होते. ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला पाहिजे, त्यासाठी शेतकरी हाच उद्योजक बनला पाहिजे, उत्पादनाची साधने त्याच्या मालकीची बनली पाहिजेत, यासाठी धडपडणारे ते हाडाचे शेतकरी होते. शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास हा त्यांच्या जीवनभरच्या कार्याचा ध्यास होता.[३०] त्यांची महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. त्यापूर्वी आणि त्यानंतरही शेतकऱ्यांची उन्नती व्हावी या एकाच ध्येयाप्राप्तीसाठी ते अहर्निश झटत राहिले.

कारण असा शेतकरी वर्ग हाच भारतीय समाजरचनेचा कणा आहे याचा कदापि विसर पडून चालणार नाही. शंकररावांनी आपल्या कृषिज्ञानाचा फायदा जनतेला सतत दिला.

सहकारमहर्षिंचे शेतकरीवर्गावरती अतिशय प्रेम होते. ते अचानक आजारी पडले व शेवटी त्यांचे ऑपरेशन करावे लागेल असे डॉक्टरला वाटले. तेव्हा डॉक्टरला म्हणत की, "या ऑपरेशनमधून जगलो वाचलो तर ठीक, नाहीतर पुढच्या जन्मी मला देवाचे बैलाचा जन्म दयावा."[३१] कारण बैलाचा जन्म का तर तो आयुष्यभर मुकाटपणे शेतकऱ्याची सेवा करीत राहतो. मला तशाचप्रमाणे राहिल्याने शेतकऱ्यांसाठीच काम करता येईल. साहेबांचे शेतकऱ्यांवरच प्रेम इतके टोकाचे होते. अगदी आयुष्याच्या अत्यंत नाजूक प्रसंगीदेखील त्यांना शेतकऱ्यांचीच आठवण येत होती.

**समारोप**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांना लहानपणापासूनच समाजसेवेची व शेतीविषयी आवड होती. शाळा सोडल्यापासून त्यांनी सक्रीयपणे १८ व्या वर्षी म्हणजे १९३६ साली सामाजिक कार्यास सुरुवात केली. मोहिते कुटुंबाकडूनच समाजसेवेचे शिक्षण त्यांना मिळाले. हळुहळु पाटीलकीबरोबरच राजकीय सत्ताही त्यांना मिळू लागली. तेव्हापासून राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यास त्यांनी वाहून घेतले. "जीवात जीव असेपर्यंत जनसेवाच करु" ह्या त्यांचे ध्येयाप्रमाणे त्यांनी अखेरपर्यंत समाजसेवेचे कार्य केले. तळागाळातील लोकांसाठी त्यांनी जास्तीत जास्त काम केले. भूमिहिनांना कारखान्याच्या माध्यमातून घरे बांधून दिली. शिवाजी महाराजांप्रमाणे सर्वांना समान संधी व समान न्याय देण्याचे काम केले. ग्रामीण भागातील महिला कशाप्रकारे स्वतःच्या पायावरती उभा राहील व सक्षम बनेल यासाठी नवनवीन योजना राबविल्या. तसेच कामगारांसाठी लोककल्याणकारी कामे केली व त्यांना चांगल्या प्रकारची राहण्याची सोय केली. १९७२ मधील दुष्काळातील त्यांचे कार्य महाराष्ट्रभर सर्वांना माहिती आहे. कुस्तीगीर, कलाकार यांना प्रेरणा व मदत त्यांनी दिली. गोरगरीबांना ते अहोरात्र मदत करीत असत. जनसेवा संघटनेचे विधायक कार्य सर्वांना कृतीद्वारे माहितच आहे. अशाप्रकारे सामाजिक कार्यात त्यांनी हिरीरीने भाग घेतला. त्याचा उल्लेख या प्रकरणात करण्यात आला आहे.

सामाजिक कार्याबरोबरच शेतीविषयक त्यांचे कार्य अख्ख्या महाराष्ट्रासमारे आदर्श असे कार्य आहे. ते स्वत: गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आले होते. त्यामुळेच त्यांनी स्वत: शेती केलेली आहे. शेतकऱ्यांच्या काय अडीअडचणी असतात हे त्यांना माहीत होते. त्यामुळे ते शेतकऱ्यांसाठी तळमळीने काम करीत असत. शेतकरी धान्य पिकवतो म्हणून शहरातील किंवा सर्वच लोक गुण्यागोविंदाने जीवन जगतात असे त्यांचे मत होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांनी प्रत्यक्षपणे शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली आहे. त्यांनी सर्वप्रथम शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन याचा विकास केला. गरीब शेतकऱ्यांसाठी सामुदायिक विशाल विहीर योजना त्यांनी सांगितली. शेती प्रदर्शनाचे आयोजन व तांत्रिक प्रदर्शन पाहण्यासाठी त्यांनी जपान दौरा केला. शेतसारा कमी व्हावा म्हणून त्यांनी शेतकऱ्यांची चळवळ केली व शहरी आणि ग्रामीण लोकांमध्ये मतभेद केल्यामुळे सिलींग कायदयाला त्यांनी विरोध केला. शेतकऱ्यांच्यादृष्टीने फायदयाच्या योजना सतत कशाप्रकारे आपल्या भागात आणता येतील यासाठी सतत प्रयत्न केला. या सर्वांचा उल्लेख या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

## संदर्भ


१. ग्रामविकास कार्य (टिप्पणी), १४-१-१९९३, पृ. ७

२. प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील-पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. २६, २७

३. संपादक श्री आप्पासाहेब चव्हाण, झंकार, पृ. ४४, ४५

४. संपादक श्री आप्पासाहेब चव्हाण, झंकार, पृ. ४४, ४५

५. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती सांगता समारंभ समिती, शंकरनगर, अकलूज, १४ फेब्रुवारी १९९४, पृ. २९

६. गोडवा, १४ जानेवारी, १९९३, पृ. ५३

७. डॉ. सं. कृ. दोडगे, अमृतमहोत्सवी जयंती स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. ३०, ३१

८. श्री. जी. बी. घोरपडे, स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. ६०

९. श्री. सुधाकर रामचंद्र परिचारक, स्मरणिका, १४-११९९३, पृ. ४६

१०. श्री. यशवंतराव मोहिते, लोकराज्य, १९-१-२००५, पृ. ६

११. शैलजाताई शितोळे, स्मरणिका, १४ जानेवारी, १९९३, पृ. ६३,६४

१२. श्री. चांगोजीराव देशमुख, रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९६२-१९८७), पृ. ९८

१३. प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील-पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. २४६

१४. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, लोकराज्य, १६ जानेवारी, १९९३, पृ. १४

१५. ब्रम्हदेव माने, अमृतमहोत्सवी जयंती स्मरणिका, १४-११९९३, पृ. ५३, ५४

१६. भाऊसाहेब संतुजी थोरात, अमृतमहोत्सवी जयंती स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. २५

१७. प्रा. मोहनराव काळे, सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील, मीनाझी प्रकाशन, अकलूज, पृ. ३०, ३१

१८. उपरोक्त, पृ. ५५, ५६

१९. उपरोक्त, पृ. ५६, ५७

२०. प्रा. मोहनराव काळे, सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील, मीनाझी प्रकाशन, अकलूज, पृ. ११

२१. प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील-पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. २३९

२२. उपरोक्त, पृ. ३०२

२३. श्री. बाबुराव शंकरराव पाटील, झंकार, पृ. १०६

२४. एच. एस. पाटील, झंकार, पृ. १४७
२५. श्री. दिनकरराव माने, लोकराज्य, १६ जानेवारी, १९९३, पृ. ३८, ३९
२६. विश्वनाथ पाटील, अमृतमहोत्सवी जयंती स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. १३
२७. शेतकरी, फेब्रुवारी, १९९३, पृ. २७
२८. डॉ. सं. कृ. दोरगे, स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. ३०, ३१
२९. नानासाहेब देशमुख, स्मरणिका, १४-१-१९९३, पृ. ५७
३०. तात्यासाहेब कोरे, लोकराज्य, १६ जानेवारी, १९९३, पृ. १९
३१. प्रमोद जोशी, परिसस्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव नोहिते पाटील-पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. ३६९